मनोहर ग्रंथमाला प्रकाशन १०३ वें

# रिमझिम

लेखिका : **योगिनी जोगळेकर**

प्रसिद्धि दिनांक : १६ जानेवारी १९६०

किंमत ३ रुपये

प्रकाशक :

मनोहर महादेव केळकर,

मनोहर ग्रंथमाला,

१६०९ सदाशिव पेठ,

पुणे २.

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

मुद्रक :

न. वा. लिमये,

महाराष्ट्र मुद्रणालय,

२५२/२/५ नारायण पेठ,

पुणे २.

**माझ्यांतील कविता जागी करणाऱ्या**

**ती. भाई आणि ती. सौ. ताई**

**यांस -**

- योगिनी

१६-१-६०.

## रिमझिम बरसण्या पूर्वी ---------

कधीं मनांत तर कधीं जनांत सुखदुःखांची वावटळ उठते. खोलवर स्पर्श करून जाते. छोटेमोठे भावतरंग उठवते. हे तरंग मग शब्दरूप घेतात. मोठे गद्यरूप पावतात, छोटे गीतरूप होतात.

पण मला गीताचें वेड आहे तसेंच संगीताचेंहि आहे. सुंदर सूर ऐकले कीं वाटतें याना अर्थ असावा - फुलांचा गंध असतो तसा. अर्थपूर्ण शब्द वाचले कीं वाटतें याना कंठ फुटावा - पावसाला नाद असतो तसा. त्यामुळेंच मनांत शद्वरूप पावलेले पुष्कळसे भावतरंग वृत्ताचें- जातीचें - छंदाचे-नादाचें बोट धरूनच अवतीर्ण होतात.

या संग्रहांतील रिमझिमत्या सरींनाहि कुठलाना कुठला सूर आहे - लय आहे... तरीपण गेयता केवळ सखीच्या रूपांत - राशीची सत्ता कवितेचीच.

माझ्या कवितांची ही पहिली रिमझिम, नेटकेपणापेक्षां नकटेपणाच आढळायचा तिच्यांत ! पण पहिलीवहिली म्हणून तिचे कोडकौतुक.

- योगिनी जोगळेकर

## रिमझिम

ही ग्रीष्म ऋतूं तिल तापट तिखट दुपार

उधळिते सभोंती ठिणग्यांचा संसार

दारची कोंवळी केळि हाय आहळते !

तो तगमग लगबग उरास जाउन भिडते !!

तों क्षितिजावरती ओली चाहुल येते

उधळीत सुगंधा हळवें पाउल पडतें

हा लळा सृष्टिचा गळां केळिच्या पडतो

मम मनांत शिरतो - 'रिमझिम रिमझिम' - गातो

----------

## आमच्या वन्संबाई !

(दादाच्या लग्नांत आठव्या वर्षी केलेलें पहिलें काव्य )

लग्न होते आमुच्या घरीं एक

पंगती बसल्या अंगणीं अनेक

भाउं माझा मग जांवईच झाला

'वन्सं' झाले मी म्हणुनि मान आला !

----------

# स्वातंत्र्यदेवतेची चाहूल

धूसर घूसर धुक्यांतुनी		अंधुक अस्फुट उषेंतुनी
दिसते कां सांगा कोणी		तुमची अमुची अधिराणी
पल्याड क्षितिजाच्या दूर		लोटे तेजाचा पूर !
त्यांत कुणाचीशी मूर्त		उजळितसे गगनप्रांत
दिव्य मंत्र बसले गात		भवतीचे भाविक भक्त
अंधुक जरि छाया त्यांच्या		स्मृती सांगतिल कोणाच्या
प्यार शृंखलांचें गान		ध्वजनर्तन करि बेभान
'चतुर्भूज' कोणी झाले !		कुणी चुंबिले विषप्याले !
आलिङ्गी फांसा कोणी !		शयन कुणाचें रणांगणीं !
- तेच जिथे सारे जमुनी		तेजोमय गाती गाणीं

त्या कवनांची जी माता		तिलाच म्हणती 'स्वतंत्रता'
अचपळ बिजली नयनांत		उदार सागर हृदयांत
अंगीं पुनवेची कांती		वदनीं तारांची दीप्ती
वसन्त नाचे पायतळीं		मधुघट झरती करकमलों
संगित फुललें हास्यांत		अमृतधारा ओंठांत
वस्त्रे तीं शशिकिरणांचीं		सुरम्य संध्यारागांची
शस्त्रास्त्रे नवलाईचीं		सहस्त्र जळत्या सूर्यांचीं
गगनचुंबि ज्वाला पोटीं		ज्वालामुखि जागे कोटी
हलाहलांनी न्हालेली		कालकुटांनी शिपियलीं
कंटकमय अंगों लेणीं		जीवघेणि ज्यांची करणी
मार्ग रोधितिल जे क्रूर		क्षणार्धात होतिल चूर
नराधमांना निमिषांत		मिळेल नरकाची वाट

शत्रू -संहारक काली नरमेधानें धालेली
वत्सल माता परि अमची दिव्य खनी मांगल्याची
हिचें ऐकतां पाऊल कठोर कारा हदरेल
श्वसनांतिल आवेगांनीं बंद कवाडें खोलोनी
पडेल जेव्हां हिची विठी शृंखलांत मग तुटातुटी
हिचा देखुनीयां नूर सुकतिल आंसूंचे पूर
मायेची फुंकर पडतां बुझतिल जखमा भळभळत्या
कोमल कर जें फिरकेल शमेल आग उरांतील
बोल जेधवां बोलेल सौख्याचा घन वर्षेल
ऊब लाभतां कुशींतली दुरितें वडतिल पाताळीं
कामधेनु ही सकलांची जीवाशा केवळ अमुची
सज्ज स्वागता व्हा आतां येते जगताची माता

----------

## थांब पावसा-

थांब पावसा, थांब जरासा, घरा चालली राधा गवळण
माथ्यावरती घागर न्हाते, आणि निथळती पायीं पैंजण
उधळित धारा, तशा भरारा, कशा फवारा इतुका काळ
अंग गोजिरें, भरें कांपरें, थुडथुडलीरे कवळी वेल
बावरलेलीं हरिणशावकें तिचिया नयनांतून पाहतीं
घाबरलेलीं दोन कबुतरें पदराखाली रे धडधडती
भिजली साडी ! जाइ बावरुन, उरास तिचिया बसली बिलगुन
भ्याले ओहळ ! येतां चाहुल, पदास तिचिया बसले विळखुन
तुझी गर्जना कानी पडतां, निजली रोमावलीहि उठते

झपाझपा ही पाउल टाकी, सपासपा कापी मार्गाते

थांब पावसा, थांब जरासा घरा चालली राधा गवळण

माथ्यावरती मेघ देखुनी, पाउस कोसळला नेत्रांतून

----------

## कवितेचा जन्म

कितीक माझ्या भाव हृदीचे

कुणा कसेतरी दावायाचे

निर्झर हे हृदयाद्रीवरचे

ओहळल्याविण सुकावयाचे

नव्या कल्पना - अभिनव कुसुमें

हृदय - निकुंजी गंध घमघमें

विस्मृतिचा परि वादळवारा

झोडपुनी ती नेइ भरारा

विचार ना शशिकलाच इवली

हृदय-क्षितिजावरति उदेली

आषाढोंचे घन तों आले

झाकुळलें तें तेज चिमुकलें

मूकपणाच्या त्या मूर्छेंत

बोल हृदींचे गुदमरतात

अव्यक्तीची कठोर कारा

उभारू ना दे गीतपिसारा

तोंच कुठुनशि मयूर केका

प्रगटे मजला मारित हांका

वीणेच्याही मधुर झंकृती

नाचत आल्या कानावरती

आणि कुणीशी दिव्य देवता

झणीं अवतरे बघतां बघतां

स्वर्गीची अवलोकुनि मूर्ती

शब्द थबकले ओंठावरती

परी करोनी यत्न बहुपरी

धडपडली वदण्यास वैखरी

अर्धे, अपुरे आणि वांकुडे

बोल उमटले कांहीं बोबडे

शब्दपंक्ति त्या नभांत विरल्या

उरल्यासुरल्या कविता झाल्या

----------------------------

# लेक आली माहेराला

नको नको पान्हा चोरूं गोठाणीच्या कपिलामाई

फारा दिसांनी आलीय माहेराला लेक बाई

जाईजुई चमेली ग फुलारावें पानोपानी

लेक माहेराला आली तिची गुंफायाची वेणी

वान्या सोयन्याधायन्या घाल फुंकर शीतशी

लेक थकलीभागली आली आज विसाव्यासी

अंगणींच्या वेलीबाई, चढा भरारा मांडवीं

माझी माहेरवाशीण आहे उन्हाला हळवी

हातसारवण घाला उखाणल्या माजघरा
माझ्या लाडक्या लेकीच्या तियें आतां येरझारा
फणसा नि हापूसा रे, आतां पिकावें झर्झरा
गृहराज्यामाजीं आला राजकुमारीचा फेरा
तूप साजूक काढूंदे आंबेमोहर तांदूळ
माझी लाडकी ती लेक, आहे जिभेची खटयाळ
तोडा पाडाची पायरी, शोधा चिंचा गाभूळल्या
'हवं नको'च्या बाधेची लेक आली माहेराला

----------

## दसरा ये सामोरा !

नवरात्र झुंजली अष्टभुजा दैत्यांशीं
विजयांकित झाली, आणि आज दशमीसी
जे प्राणपणाने लढले रणि झुंजार
साजरा कराया, दसरा त्या अधिकार
जे सर्वस्वानें देशास्तव संन्यासी
जयमाला आजचि त्यांचियाच कंठासी
बोलणें, चालणे, श्वसनें देशासाठीं
दुंदुभी आजच्या गाति तयां यशगीती
नाटकी उमाळे आणि बेगडी चाळे
बाहेरुनि बगळे आंत कावळे काळे
नाण्यावर नाचे, देशप्रीति ? छे ! वेश्या
सावधान ! समजा - मायावी ती भाषा
सत् न्याय नीतिच्या सीमाही लंघियल्या

ना अशांचियास्तव दसरा आज उदेला

त्या निबोल, निर्मल, स्नेहल, सुशील वीरा

आलिंगन द्याया, दसरा ये सामोरा !!

----------

## उत्तरेची उत्तररात्र !

रजनीच्या समईत कधींची चंद्रकोरिची ज्योत मिणमिणे

रात्रिचर हा पिसाट वारा, गाई भलतेंसलतें गाणें

संगमरवरी घुमटावरती, अशुभाची ही पाल चुकचुके

चंदनाचिया मंचकावरी, जहरी नागिण स्मृतिची डंखे

राजपथाची करुनि हातरी, हातपाय पसरिते खिन्नता

प्रासादाची उशी करोनी खुबत पहुडे संगे कटुता

अनुरागानें रंजित, गुंजित प्रीतकमल दल सहस्त्र उमलत

नियतीची उन्मत्ता हत्तिण, शुंडादंडें करिते खंडित

वाऱ्यावरती लहरत जाती, दुखावले, कोवळे पराग

हतभाग्याची वीज कडकडे, अवतीभवती उसळे आग

बालरवीसम तेजें गाजे, रणांगणीं अभिमन्यू मम पति

शत्रुत्वाचें ग्रहण लागुनी, अकालीच अस्तंगत होती

सहगमनास्तव जीवनसाथी, चितेकडे जों घेते धांव

अंतरांतुनी कुणी इवल्यानें चरणांना केला अटकाव

अभिमन्यू रे - चितेंत तरिही भस्मसात तव प्रिया नि कांता

आज जगीं ही उरलीसुरली ... केवळ तव बाळाची माता !!

------------------

## साय-साखर

सासराहुनी माहेराला फार दिसांनी आलें आज

आठव येउनि तुझा माउली, उरांत उसळे असीम गजबज

'आजि- आजिसें म्हणत कांहिंसें, अजाण बाळें पुढें धांवली

भितीवरची प्रतिमा बघुनी अडखळलीं तेथेंच थबकलीं

मीहि थबकलें, हांक थबकली, खुळया स्मृति पण नाहीं थबकल्या

पापणिच्या टोकांस बिलगुनी, पदरझोंबि अन् घेउं लागल्या

पित्यामागुती, होउनि कुंती, डळमळलेला सांवरला रथ

तूंही जातां आई आतां - वादळलेला नुमगे पंथ

नमस्कारितां-भासे फिरला पाठीवरुनी सायीचा कर

कानांच्या जिभलिनें चाखली तुझिया शब्दामधली साखर

देवावांचुनि जसें देवघर, मायेवांचुनि तसें मायघर

आठवणी गे पाठराखणी-पुरव तूंच मज साय नि साखर

---------------

## जा ! परंतु....

जा खुशाल सूर्या, ओलांडुनि भूलोक

हृत्पटी रेखनी तेजाचे आलेख

जा खुशाल चंद्रा, घेउनि पुनवा - रात

अंतरीं सिंचुनी सुधावर्षणी स्रोत

जा खुशाल पवना, संचरण्या विश्वांत

चापल्य भरोनी देहींच्या जडतेंत

जा खुशाल कुसुमा, मान टाक मातींत

गंधीत श्वासितें रोमरोम पेरीत

जा क्षण:प्रभे, हो लुप्त मेघराशींत

तव नेत्रदीपता भिनवून मम प्रज्ञेत

जा कृष्णघनांनो, करा जिवाचें पाणी

ते परार्थ आयू ! - आम्हातें शिकवोनी

जा दिव्य क्षणांनो करांतुनी निसटोनी

दिव्यतापावलें हृत्कुहरी शिल्पोनी

----------

## अखेरची मानवंदना !

( कै. रामभाऊ तटणीस यांस )

अखेरची ही मानवंदना, तुला आमुची झुंझारा

महाराष्ट्र हा विस्मरेल ना, तेजाचा तुटला तारा

शब्दाच्या ठिणग्यांत भडकले, ज्वलंत जागृत स्थंडील

राख कराया-खाक कराया-सोंग ढोंगांचें व्याळ

दश दिशांतुनी भिरभिर फिरली, तव तत्त्वांची असिल्लता

मुर्दाडांची मढीं गाड़नी, मदांधास हाणित लत्ता

भुजा पिटोनी, मुष्टी मुरडुनी, तुझी जेधवां ये हांक

मरगळलेल्या चैतन्यावर, जितेपणाची ये झांक

तेजाचे पाजळून पलिते, तुवां आपुल्या हातांत

चोर दरोडेखोर दाविले, दडलेले अंधारांत

निजल्या धैर्या जाग आणुनी, शिणल्या शौर्या उठवोनी

फटफटलेलें पुरे न बघतां, कसा मावळे वीरमणी

तुझा ऋणाइत महाराष्ट्र हा, तुला चिरंतन गाईल

तत्त्वदीप तव गृहागृहांतुन जिवापलिकडे जोपेल

## दिवस

धुक्याची दुशाल दिवसाचे हैं बाळ

कधींचें करीतें आहे चुळबूळ

सोनजावळाची हेलावते बट

ओंठांची लालडी बोलते अस्फूट

शुक्र चांदणीची बाहुली भिर्कावी

चिमणाळीं जडलीं पांखरें ऊडवी

कुशींत घेवोनी ऐसे हैं बालक

वसुंधरामाई करीते कौतूक

मायलेकरांचा सोहळा पहात

भारावून होते उभी अंगणांत

तोंच- माजघरी पाळणा बोलला

"अग तुझा दीस-येथ उजाडला !"

--------------------------

## रस्सीखेंच

मन जडे माय घरों चित ओढे त्या सासरीं

एक पाऊल पुढती एक राहिले मागुती

मागें श्रावणाचे बन पुढे वासंतीक गान

मार्गे माउलीची ओढ पुढे यौवनाचे वेड

मागें शुक्राचें चांदणें पुढें चंद्राचीं किरणें

मार्गे वात्सल्याचा पूर पुढे अनामी हुर्हुर

मागे मायेचा पिसारा पुढे स्वप्नांचा फुलोरा

अंगाई एका कानांत दुजा कानों भावगीत

माझा जीवनहिंदोळ मागें पुढे घे आंदोल

माझ्या भावनाचे धागे गुंतताती पुढे मागें

सासर माहेर यांची ऐसी चाले रस्सीखेची

----------

## ओरखाडा !

वर्तमान झोकांत पहुडला

भूतकाळचें उसें करोनी

उशींत भरले आंसु उसासे

आणि पिंजल्या त्या आठवणी

कधीं चायरा प्रसंग येउनि

नखक्षतांनी ओरखाडतो

शिवण उशीची अशी उसवुनी

स्वप्नांचें घरकूल मोडितो !

----------

## शब्दांनो....

शब्दांनो हा संक्रमणाचा दारि उभा दिवस

वर्षभरास्तव खाउनि घ्यावा, आज गोड घांस

कटचार खुपसुनि जिव्हेची त्या, जखमा ज्या करता

हाडास भिनती, पुन्हां न बजती, काळाच्या हाता

कुठार घालुनि, घाव घालिता, जधीं मुळावरती

उखड़नि पडती, जखबुनि जडली मायेचीं नातीं

विखार बनुनी, भरल्या ताटीं, गरळ तुम्ही टाकिता

देवामधुनी दैत्य निर्मिता, सुधेंतुनी कटुता

अनल होउनी, आग ओकिता कोमल धाग्यांत

खाक होउनी, राख राहते, बाकी नशिबात !

सुधावर्षिणी, दिव्य पर्वणी, आली दारांत

वर्षभरास्तव प्राशुन घ्यावा मधुवा आकंठ

पाणपोई मग मधुशब्दांची अखंड बरसेल

अणुरेणूंतून मानवतेची द्वाही फिरवील

----------

## चंद्रम हंसला ग....

चंद्रम हंसला ग नभीचा, चंद्रम ग हंसला !

        बांधावरती बघुनि एकली हिरमुसली बाला

चपल अशी कों पोर विजेची चंचल चमचमली

        सुरत जणूं तो कोर बिजेची अवनीवर आली

मुसमुसणारी लोभस काया कांती रसरसती

        तारुण्याची नवी नव्हाळी फुलली तनुवरती

शोधक डोळे कुणा हेरती भिरभिर फिरफिरुनी

        पुन्हां पुन्हां ही काय ऐकते उत्सुक कानांनीं

भलत्यासलत्या शंका येउनि, उरांत धडधडते

        'माझी माया देवाजीला !'-अस्फुट पुटपुटते

तोंच दूरवर दिसे सखा ? छे ! प्राण तिचा दुसरा

        बघतां बघतां कोमेजलेला मुखडा हो हंसरा

खेळ क्षणाचा असला पाहुनि चंद्रम तो हंसला

        बांधावरती बघुनि कुणासह उल्हसली बाला

----------

# ज्ञानेश्वरांची ज्ञानदेवी

हीं अमुची गंगामाई ।

हीं अमुची गोदाबाई

या गंगेतुन अखंड अविरत

ओहळती ज्ञानाचे स्त्रोत

आर्त पिपासा होई पूर्त

तृषितांना आशा येई

कुठे बाजुला सान रोपटीं

जलावीण आक्रंदन करती

आर्द्र करांची घालुनी मिठी

उपेक्षिता जीवन देई

याच जलावर अंकुरलेल्या

वृक्षवल्लरीं कुसुमित झाल्या

दाहि दिशांना दरवळ गेला

ही हिची कारवाई

परमेशा तुज एक विनंती

या गंगेची जीवनज्योति

उदंड अक्षय ठेव जागती

तेजोमय स्फूर्तीदायी

----------

## चाहूल !

हृत् ज्योतीवर उभी काजळी, कोण झाडतो कथिकाळीं ?

ढगाळलेल्या मनो- निराळी, किरणांचीं फेकीं जाळीं

निःशब्दाच्या भावसागरी, तरंग उठवी शब्दांचें

काळोखाच्या कातळावरों, शिल्प रेखितो प्राचीचे

संकट - शल्यांतून मनिच्या, मृदुला मखमल कोण भरी ?

प्रखर संसृती तापामधुनी, आणि सिंचितो शीत-सरी

दुर्बलतेनें पांगुळलेल्या मना समजवी- 'जाइ पुढे'

दुःस्वप्नांनीं पेंगुळलेल्या जिवा जागवी, नीज उडे

चुरगळलेल्या आशांमधुनी, कोण उभारी चैतन्या ?

मरगळलेल्या मनास माझ्या, पदोपदीं हे संजिवना

कोण असे हा ? कळलें नच कां ? कशी न आली चाहूल ?

मनोमंदिरी भरेला - उरला-परेश त्याचा हा खेळ !!

----------

## मुक्त आणि कैदी

तूं पड़ख उभारुनि नभीं मार भरारी

मी सांवरती पख पडें पंजरद्वारों !

ओतीत उभा तेजघटां भास्कर व्योमीं

घे न्हाउन तूं; काजळतों घोर तमीं मी !

तूं मुक्त-तुला दाहि दिशा घेत कुशींत !

मी बद्ध - मला विश्व उभें दीड वितींत !

वनदेव स्वयं पुष्प फळें अर्पिति तूंतें ।

फेंकील कुणी घांस कसा, चाविन येथें !

तूं स्वैर सुरी गात रहा मंजुळ गाणी

        पढवील धनी तीच मला ठाऊक वाणी !

देहांतिल मंदावुनि रे जाइ उबारा !

        जीवास तरी ना चुकणें भेसुर कारा ! !

जा विस्मरुनी प्रीत तुझी; मार भरारी

        जा विस्मरुनी जो मम आघात जिव्हारीं !

स्वातंत्र्य करो जन्मभरी साथ जगांत ।

        आदेश अखेरील परी ठेव मनांत

----------

# हीं ललाट लिखितें

हीं ललाट लिखितें स्वतःच उजळायाचीं

भाळिची भाकितें स्वतःच रेखायाची

गाडलें बीज हैं फोडुन बंध धरेचे

कवळते नभा, उभवून बाहु शाखांचे

जो थेंब चिमुकला झिरपर्णीत लोपावा

तो सागर होउन, त्रिभुवनांत गर्जावा

जन्मजात मृण्मय, काजळला जो देह

मिरवतो हिरण्मय, मानाची राणीद

भोगिते बाष्प जे वरात वाऱ्यावरची

हो मेघमालिका सुधार्वावणी साची

सानुलें सुमन हें जरी असे क्षणजीवी

तें रुधिरप्रदानें अत्तरांत चिरजीवी

जो फत्तर म्हणुनी, माथा लत्ता खाई

तो घाव झेलतां, विश्ववंदना घेई

जें कसलें आयू, दिलें परेश हातीं

गडदणें-उजळणें - तुझें तूंच रे अंतीं !!

----------

## माझ्या कुसुमांनों

माझ्या कुसुमांनों व्हायचें तुम्हांस पाषाण

त्यागुनि कोमलते यापुढे धरणें काठिण्य

हदरे जी काया वायुच्या इवल्या श्वसनांनीं

प्रलयवात ती करो पराभुत पारुष कवचांनीं

हास्य नभश्रीचें गोजिरें, लास्य निर्झरांचें

कूजन विहगांचें, गज वा त्या वनदेवींचें

सौरभ-गीतांनी गाऊनि ना दावायाचें

रंगशालाकांनी चितारुनि ना खुलवायाचें

फूलपाखरांना सौख्यमय देण्या आंदोल

रात्रंदिन शिणला जिवांचे करुनी हिंदोल

तो मृदुला माया जोंजवा हृदयाच्या हृदयीं

निर्घुण निर्दयता पालवो तुमच्या त्या देहीं

जीवनरस तुमचा मधुप ते लुटलुटुनी नेती

क्षुधा - शांति होतां विसरती मग पहिली नातीं

हृदयमाझारी मधूचे कुंभ अतां दडवा

शोष पडो कोणास, ना तमा ओस पडो जगवा

दुरंगि दुनियेत तुम्हाला मातीचें मोल

सावधान वेळींच होउनी सांभाळा तोल

नव्या मामल्यांत, रक्षणें जरि तुम्हां प्राण

एकच संदेश - " फुलांनों व्हावें पाषाण

----------

## उत्कांत जीवन

देवघरांतिल या इवल्याशा प्रशांत ज्योतींत

विश्व उजळती तेजशलाका होइल उत्क्रांत 1

सान पांखरू घरट्यामाजीं भिरभिरतें आज

गरूड होउनि दिग्पालांशी करील हितगूज

इवला ओहळ खडकाळींतुन खळखळतो आज

सागर होउन तुफानासवें घेइल रे झुंज

कोंब कोंवळा, आज बिलगला कुशीस वसुधेच्या

देइल धडका, उठतिल शिणका शरिरीं गगनाच्या

चिमण्या ओंठों आज उमलती बोबडेच बोल

याच मुखांतुन भाविकालची गीता उमटेल

----------

## तृप्ती !

सुवर्ण नसूंदे परि सोन्यासम, सगेसोयरे अवतीभवती

त्यांच्यासंगें क्षण जे जाती, तेच अमोलिक माणिकमोती

जरी नसेना आभरणांना वस्त्र रेशमी, खंत कासया
मृदु मायेचे रेशिम धागे बिलगुन बसले सदैव हृदया
मजले मजले उन्नत इमले, जरी बांधले मी न कदापी
हिमाचलाहुन तुंग भासते, खोपट्यांतली मज माणुसकी
नाना परि अन् नाना कुसरी, पक्वानांनीं नटे न पान
घांस आइच्या करिचा खातां, रसनेला हो अमृतस्नान
आणि जेधवां गोपाळांचा मेळा नाचे माझ्या गेहीं
मस्तकांतुनी स्त्रवूं लागते, संतृप्तीची गंगामाई

----------

# वेगळा !

कधीं कंकणांच्या मृदू झंकृतींनीं, मधू भाव नादावले ना उरीं
निनादे तिथे नांद त्या शृंखलांचा, अहनश ज्या मातृभूच्या करीं
कुणा लोचनींच्या शरद्चंद्रिकेनें, न हेलावला आणि हृतसागर
जिता घोर ज्वालामुखी दूर कोठे ! उधाणून त्यानें कढे अंतर
कधीं हालत्या अंचलें चंचलेच्या न धुंदावुनी जीव हिंदोळला
परी लक्तरां देखुनी मायभूच्या दुजा मत्स्य भासे जगावेगळा
जरी रक्त रंगांत रंगे अनङ्ग, कपोलों कुणाच्या तरी अंधळा
कुठे श्रांत गात्रांत, निर्जीव नेत्रांत, विक्लांत जीवांत याला लळा
नसे कांचनाची, नसे कामिनीची, नसे कीर्तिची, मुक्तिची या स्मृती
अशा आगळयासी, जगावेगळ यासी म्हणोनीच गाईन मी आरती !

----------

## सांग अशोका

सांग अशोका, शोक सरेना 'अशोक' तुजला म्हणूं कशी ?
नेत्रांचे हे घडेच उपडे, दोहि थडीना जलराशी !
भयाकुला मी विरहव्याकुला. इथें जानकी दाह उरीं
तरूवेगळी कळी, तशी मी लोळण घेते भूमिवरी
जीवनांत या 'राम' कशाचा, रामाना जर अंतरलें
जीवनांत या प्राण कशाचा प्राणवायुना जर मुकले
काय कथं रे सहवासाची किमया तुजला अरे खुळया
कंटकशल्यें ? छे ! कमलदलें, उन्हांत चंद्रम पाझरला
स्वर्ग सोडुनी सौख्य धांवले झोपडींत गोदाकाठी
श्रांती आली विश्रांतीला, घालि राघवा चरणमिठी
दारवंटिच्या कल्पतरूला आंचवली ही अभागिनी !
मूर्ति राहिली वनांत तिकडे, भक्ति इथें बापुडवाणी !!

----------

## हिंदभूमीचा सुपुत्र

सह्याद्रीच्या पाषाणांनीं ताठर केले छाताड
विध्याद्रीच्या पहाडासवें कणखर झालें हे हाड
हिमाचलाची अजोड उंची अंतरांतुनी सामावे
उन्नत आशा, उन्नत आयू, उन्नत मायभूस न्यावें
गंगा गोदा यांचें खेळे नयनी त्या निर्मळ पाणी
कुरुक्षेत्रिच्या श्रीकृष्णाची ओठांतुनि उमटे वाणी

धनुर्धराच्या तीक्ष्ण शरांची शस्त्रांना याच्या धार

श्रीरामाच्या बाणा ऐसा कधीं न ठावी माघार

----------

## माहेरचें मूळ

" येवढी खुललीस, येवढी फुललीस,

ओठांतल्या ओठांत कांग हंसलीस ?

आलं तरी कोण ? गेलं तरी कोण ?

सासुरवासिनी-सोड जरा मौन "

समजलं नाहीं ? उमजलं नाही ?

तो येतो आहे- दिसलं नाहीं ?

नवानवासा चुडा, हवाहवासा साडा,

गोडाधोडाचा माथ्यावर घडा

" अग पण कोण सये-बांगडीवाला ?

आला साडीवाला की मिठाईवाला ?"

" पल्याडचं घर दिसताय् - पल्याडचा मळा-

माहेरचं मूळ घेऊन श्रावणमास आला !"

----------

## झिम्मा !

झिम्मा रंगतां रंगतां रात्र झालीय लहान

लहानग्या रात्रीसंगें विरघळलें मोठेपण

नाहीं कोणाची मी कांता, नाहीं कोणाची वा माता

पोर परकरी जहालें, गळे शोक-जळे चिता

झिम्म्यासवें रंगे. रात, रात्रीसवें रंगलें मी

ऐसे रंगतां मीपण होते जाणीव निकामी

वर्षांतून कधीकाळी झिम्मा असाच रंगावा !

गौराईच्या पंखाखालीं जीव सानुलासा व्हावा !!

----------

## माझें अंगण !

माझ्या अंगणीं माणिकाची रास ग !

माझ्या अंगणीं मोतियाचे घोस ग

बाळगोपाळ गोपी आल्या

मैना इवल्या रानांतल्या

आले बुलबुल वाऱ्यावरी

आले कोकिळ तानावरी

खेळायाचाचि हा एक ध्यास ग

मोग-याचा तुरा न्यारा, करी नखरा ओठांत

मंजिऱ्याच गोजिया, भुरभुरती केसांत

दारि फुलले वासंत हास्य ग

मेघांचे साध्यरंग खुलले हास्यांत

सरितांचे गोड गान उमले बोलांत

अमृतास लाजवीत कानीं येतात

माझ्या दारांत स्वर्गाचा भास ग

----------

## तरीहि -

धडपड ही नैराश्य तमांत

        कविता आशादाय तरी

मूळ गाडलें काळया मातित

        अङगांगी कुसुमें गोरी !

--------

## उजळ तुझें हें भाळ !

सख्या रे उजळ तुझें हें भाळ

तुझिया दारीं बघ सोनेरी तिष्ठत भावी काल

        शशिकिरणांची ओढणि घेउन

        नूपुर तारांचे पद गुंफन

        रुणझुण रुणझुण करितें यौवन

थाटमाट नवलाचा करुनी

        राणी ये लडिवाळ

        सौख्याचा घट मिरवित मायीं

        येईल तुझा जीवनसाथी

        जुनीपुराणी विसरुन प्रीती

आनंदाची नूतन माला

        गुंफी सांजसकाळ

----------

## गौरीहरापाशीं नववधू

| | |
|---|---|
| आला वरराजा द्वारों | मंगल वाद्यांच्या गजरीं |
| माझ्या भविष्याचा धनी | गौरीमाये, आलें ध्यानों |
| माझ्य भाग्याचा नियंता | गौरीमाये, आलें ध्यानी |
| माझ्या मांगल्याची मूस | उमगलें अंतरास |
| त्यासी दीर्घायू मागते | त्यासी आरोग्य याचिते |
| आज पुष्पांच्या हारांत | गुंफ आमुचें जीवित |
| घाली गळां काळे मणी | मांगल्यांत मंतरोनी |
| द्यावी सात पाउलांत | साता जन्मासी सोबत |
| आतां अंतीम मागणी | करी सौभाग्यसम्राज्ञी |

----------

## पुन्हां एकदां

नको घाबरूं, नको घाबरू, ध्वजा चढू दे गगनांत

स्वप्नांतरिच्या अमूर्त आशा, समूर्त करणें साक्षात

याच ध्वजाच्या भुजा लागुनी रथ भानूचा अडखळला

याच ध्वजाची फडफड श्रवुनी मारुत हृदयीं घडघडला

बिसतंत काढुनी देहाचे नरवीरांनी हा विणला

भाळींचे देउनिया कुंकुम, कुणा सतींनीं रंगविला

हौतात्म्याच्या जीवनज्योती हृदयीं याच्या धगधगत्या

अ-क्षर इतिहासाच्या ओळी कणाकणांतुन झगमगल्या

पुन्हां एकदां त्या तेजावर नवी झळाळी झळकूं दे

पुन्हां एकदां भारतभूचा माथा उन्नत होऊं दे

----------

## थोरांचें जीवन

तेजोमय करण्यासी धरणी, अखंड जळतो नभीं दिनमणी

मौक्तिकमय करण्यासी अवनी, देह लोटिला कृष्ण घनांनीं

घांस पुरविण्या उभ्या जगाला, उरांत घेई फाळ धरित्री

प्यास पुरविण्या उभ्या जगाची, रक्तदान करते जलवंती

पुष्पफळें देण्या वसुधेसी, मूळ गाडुनी गे मातींत

गगनचुंबि उभविण्या राउळें, फत्तर गुदमरले पायांत

जनामनांना जागृत करण्या, संत साहती घोर प्रहार

राष्ट्रभूस सालंकृत करण्या जीवन ऐरण बनवी वीर

पिढीपिढींतुन दीप उजळण्या, काया कर्पूर अर्पी ललना

कणाकणा ओतण्या चेतना, थोर भोगिती अशा जीवना

----------

## परीस !

वाटेंत पसरले होते काटे

        वाटे याला अंत नाहीं !

वाट अवघड, घाट अवघड,

        वाटे याला माया नाहीं !

एक दिवस-तूं आलास

        हळूच हंसलास वसंत झालास

दिशांचीच फुलें झालीं

        आभाळाला कंठ फोडलास

जडजूड माझें ओझें

        क्षण लोखंडाचें लोढणें

तूं आलास - परीस झालास

आयुष्याचें झालें सोनें !

----------

## बाळाचें हास्य

निळया धुक्याच्या वेढून शाली

स्वप्नपऱ्यांची रांग परतली

मेंदिमाखले करपद लागुन

अवतीभवती चढलो लाली

त्याच पऱ्यातिल कुणी लबाडी

अजुन लोचनीं तुझ्या खेळते

हळू गुदगुली करते म्हणुनी

बालकपोली हंसू उमटतें

----------

## कापूर

सुखांत माझ्या दुखतें आहे

फुलांत कांटा सलतो आहे

ज्योतिच्या या दीप्तीमधुनी

खोल कांहि फडफडते आहे !

भरल्या ताटीं उघड्या ओठीं

पक्वान्नांचा घांस अडखळे

चंद्रकोरिचा खंजिर लागुनि

गतस्मृतींची जखम भळभळे !

दीपावलिची अशीच संध्या

सोनपाउलीं होती ठुमकत

सोनसळींचा शेव सांवरित

सोनचांफिची वेणी माळित

वदनीं गुणगुण, चरणीं रुणझुण

मांगल्याचें समूर्त गीत -

ताईसंग माझ्या चिमण्या

आतषबाजी होतो उडवित

तोंच पेटत्या फटाकडयानें

होरपळे तो चिमणा जीव

फटाक्यासवें संपुनि गेला

भातुकलीसम जीवनडाव !

दीपावलिला अजून कुठेही

फटाकडयाचा ध्वनी ऐकता

या बीजेच्या चंद्रकोरिचा

कापुर होतो- जळता-जळता ! !

----------

## शतजन्मींची वैरिण लाज !

कितीकदां रे क्षण सोनेरी घेउन आलें तुज दाराशी

कितीकदां रे समूर्त होण्या धडपडल्या स्वप्नांच्या राशी

पापण्यांचिया तारांमधुनी तव हृद्-वीणा कधि झंकारे !

साथ द्यावया त्या वीणेला खोल कुठेसा जीव थरारे

कितीकदां रे सहवासाचा फुलविलास भोंवती वसंत

सशब्द होण्यास्तव फडफडली मनांतली कोकिळाहि व्यर्थ !

शब्दांच्या पालखींत जरिहि नाहि मिरवलें मनिचें गूज
तुझ्या घराच्या उंबरठ्यावर या नयनांचे उभे क्षितीज
चंदन होउनि झिजविन म्हणते तुझ्या देउळीं माझें यौवन
कर्पूर होउनि जाळिन म्हणते तुझ्या राउळीं माझें जीवन
परिमल तूंची, कमलहि तूंची, तूंच जागृती, सुषुप्ति, नीज !
सांगिन म्हणतां - पदर ओढिते... शतजन्मींची वैरिण लाज !

----------

## कुठवर झांकावें ?

हा लाजेचा साज उतरुनि कसें बरें यावें ?
मनांतलें तें जनांत दिसतां, कुठवर झांकावें ?
बोलूं नये तर लालि गालिची सांगतसे कांहीं
पाहु नये तर मिटल्या डोळां तुमची मूर्ती ही
ऐकु नये तर कानीं येती तुमचे पोवाडे
चालुं नये तर वाट पायिची तीच दिशा वेढे
काय करूं तरि उरलें नाहीं मी माझी आतां
या गंगेचा सागर होइल हो बघतां बघतां

----------

## स्वातंत्र्याचा ठेवा

पंख पंजरीं गुदमरलेले उडावयातें विस्मरलेले !
पुन्हां उभारा, पुन्हां भरारा नवक्षितिजांचा पिण्यास वारा
सामगायनें स्वातंत्र्याचीं गळ्यांत जखडुन पडली साची
आज मोकळे करोनी गळे जयघोषानें भरा निराळे

हृतकुहरांतिल सहस्त्र निर्झर दडपित होते कठोर फत्तर
जातिवंत उसळो जलवंती पावन करण्या आर्त धरित्री
तें स्वातंत्र्य-जें चिरवांछित तुझ्या अंगणी उभे शुचिस्मित
अमृतवर्षी अमूल्य ठेवा भावि पिढीस्तव जतन करावा

----------

## मांगाचें हृदय !

( दि. ८ एप्रिल १८५७ रोजीं मंगल पांडे या क्रांतिवीराला फांशी द्यावयाचें ब्रिटीश सरकारने ठरवलें. पण स्वातंत्र्याच्या ज्योतीची दीप्ति फांशीच्या मांगापर्यंत पोंचली होती. बराकपूरच्या मांगानें मंगलच्या बाब- तींतले हें अमंगल कार्य नाकारलें. तीच ही काव्यकथा )

आज फांशीच्या मांगाचा, घांस घशांत घोटाळे
आज फांशीच्या मांगाचा, पाय घरांत घुटमळे
आले सरकारी फर्मान -' देणें पांडे यांसी फांशी,
काम बिनधोक, चोख, तरी खुषीची बक्षीशी

नोहे अक्षरांची ओळ-हें तो अप्सरांचें कूळ
भूलभुलावण चारी थोर तापसीया धूळ
परी मांगाचें आंतड़ें आज चळेना-वळेना
झाला वाल्याचा वाल्मीकी ' याद मनींची जाईना

काळया पहाडाच्या पोटीं जिता वहाळ खळाळे
काळया मांगाच्याही ओठीं, फूल अग्नीचें फूललें-
"शिवबांचे, बाळाजीचे, म्हादबाचे जें हो खूळ
त्यानें मंगल पांडयाचं मानगूट पकडलं !

भूत जब्बर - जब्बर घेना कोणाची खबर

तेणें पांडे झपाटला - खातो देवऋषी हार !

ऐशा अस्सली नागाला-मांग काय चेचाटतो ?

फिरंग्यासी-चाकरीसी-आतां रामराम घेतों !"

----------

## जीवित माझें

जीवित माझें शुष्क काष्ठवत्, उरे जरी ना लव ओलावा

तरी अंतरीं आस धगधगे, त्या काष्ठांचा बनविन पावा

आणि स्मृतींची वायुवीची घालिल फुंकर जेव्हां त्याला

त्या पाव्यांतुन फुलेल भंवती, दसलाखाची ती स्वरमाला

जीवित माझें रुक्षच फत्तर, रंगरूप त्या ओबडधोबड

त्या दगडांतुन मूर्ति घडावी, अशी जिवाला अदम्य ओढ

सुजनांच्या सहवासामाजीं स्वर्णभयी ज्या घटिका गेल्या

मूर्तीला सजवाया घालिन त्या घटिकांच्या गुंफुन माला

जीवित माझें उजाड भूमी, वृक्षलतांची तिला न पांखर

नैराश्याच्या ग्रीष्मर्तनें करवतलेलें जळतें अंतर

परी उरीं मम स्वप्न बिलगलें, तुझीं आंसवें तिथें सांडतिल

आणि करपल्या वातावरणीं, अत्तराचिये मळेच पिकतिल !

----------

# महानंदेचें हृद्गत

पंकांत जरी जन्मा आली

प्रभुसाठि उमलली कमलकळी

काळा कातळ पाणी निर्मळ

काळी कोकिळ वाणी मंजुळ

कलंकितेचें जीवन काजळ

स्पर्शनेंच आतां उजळी

माझें जीवन जरी विखार

विषप्राशिता असशी तूं तर

कर्पुरगौरा कायाकर्पुर

तुझ्या मंदिरीं हा जाळी

हिमाचलांतिल होउनि हिमकण

देह करावा हा गंगार्पण

तुझ्यांत हरवुन माझें मीपण

अद्वैताच्या ने जवळी

----------

# माळ !

तुझ्या हातची मिळे न माला सांग कशाला स्मरूं

बहुमोलाचें दिलेस त्याचें मोल कशानें करूं ?

नयनांच्या शेतांत पिकविला मोत्यांचा तूं मळा

त्या मोत्यांची जीवनभर मी लेइन रे माला !

----------

## सत्य न तें, भास क्रूर !

पाहूं नको वाट पुढिल जन्मीचा वायदा

पाहूं नको वाट क्रूर नियतीचा कायदा !

पाहुं नको वाट वृथा फुले विकसण्याची

जपुं नको शाखा गे उन्मळल्या वृक्षाची !

ऐकुं नको गान अतां विरलेल्या स्वरमाला !

रेखूं नको चित्र अतां विस्कटल्या भावकला !

बांधु नको बंध पुन्हां, ओघळला मौक्तिकसर

सांधु नको कळसाला, भग्नकळा मूर्तीवर !

धांवुं नको - उर फुटशिल ! क्षितिजासम तो दूर

जाउं नको मागावर - सत्य न तें-भास क्रूर ! !

----------

## खडा !

लेकि सुना अन् मुलं लेकरं

गजबजलेलें हें माझें घर

संसाराच्या या डोईवर

ठुमकतसे सौख्याची घागर

श्रावणांतल्या सायंकाळीं

विसांवले मी बकुळीखालीं

बकुल फुलांचा मंद सुगंध

वातावरणीं भरतो धुंद

गंधाचें त्या धरुनी बोट

बाळपणाची धरली वाट

अशीच बकुळी अशीच सांज
दूर राउळी अस्फुट झांज
कुणी सांवळा-कुणी धिटुकला
मला राधिका बनवुन गेला
जातांना वेडा नि भाबडा
हळूच मारुन जातसे खडा
तोच खडा परि आज अवेळीं
खुणावितो मज बकुळीखालीं
बकुळामाई छपव हा खडा
डोइचा घडा... जायचा तडा !
कुठली राधा कुठे मुरारी
होडी लागे अन्य किनारीं ! !

----------

# धूळ

हो लाल धुळींतिल वेडीतेढी वाट
कुरवंडिन हिजवर गंगेचेही पाट
त्या धुळीत मिसळे पायधूळ आईची
त्या धुळाक्षरों मम पाटी बालपणाची
त्या धुळींत उधळे ही खिल्लारी पाडी
बाबांची माया थोपटते तिज वेडी
वाटते कधि कधि संसारा विसरावें
कण धूळ बनोनी धुळीत त्या मिसळावें !

----------

## चेटूक

निळे निळेसे आभाळ, नील डोंगरांची ओळ
श्याच्या कुशींत खळाळे, निळानिळासा बहाळ
जाईजुईला चढली निळया गोकर्णीची कांती,
पीत शेवंतीला आली कृष्णकमळीची गती
नानारंगी, नानाढंगी पाखरांची में ना वाणी
नीलकंठ मयूरांची झाली भवती दाटणी
बाई मृगांच्या लोचनीं आज दिसेना काजळ
तिथें चकाके-लकाके रत्नांतील अनील
बहुरंगी जीवनाचें आज अिद्रधनू लोपे
अंतरंग बहिरंग निळाअितीनें या व्यापे
निळया चेटकाचा सखे उमगेना देवऋषी
कसें निळयानें या केलें, मसी अंशी वेडीपिशी
लुटूलुटू' 'वुडदुडू-' बाई वाजलें पाऊल
अग, कशाचें चेटूक ? -हा तो माझा घननील !

----------

## बाहुली !

माझी प्रीत वाटली कां तुला बालकांचा खेळ
मांडायाचा-मोडायाचा सारा लुटपुटा मेळ
पोरा लागते बाहुली-तुला एक गंवसली
होय बाहुली-बाहुली-माझ्या लोचनीं बंसली !

----------

## भविष्या

तब नगरीच्या उंबरठ्यावर थबके पाऊल

आणि भविष्या हृदय घेतसे, तुझीच चाहूल

स्वर्ग सुखाला लाजविणारे वसतिल आलोक

तुलाच ठाउक ! अश्रूंचें वा दिसतिल आलेख !

कोकिलकूजन, कुसुमा विकसन, हंसेल वासंत

अग्नी उधळिल, जीवन शोषिल, ग्रीष्माचा वात

फुलारेल आशांचें उपवन, पिसारेल मनचा मोर

अथवा किडुनी, कुढुनी कानन, झडेल पंखांतिल जोर

रजनीच्या कातळावरोनी, झरेल अमृत चंदेरी

माध्यान्हींच्या स्थंडिलांनी ज्वाला फुटतिल नभांतरीं

समूर्त होतील स्वप्ने सारीं, संगमवरी शिल्पांत

वाऱ्यावरि वा विरतिल आणि विरघळतील धुक्यांत !

रम्य रागिणी, मधुर स्वरांतुन आळवील जीवन-राग

गुदमरेल संगीत गळयांतच तुटे तार जागोजाग !

पाय उचलिता बरसो जीवन, वज्र पडो वा मृत्य चें

तुझीच किमया तुलाच ठावी ! नगर तुझें तें जादूचें

----------

## गायकास-

( पावसाळी उदास सायंकाळीं विलायतखाँनीं गाणें ऐकवल्यावर)

वर्षाऋतुचि सांज उदासी ढाळित होती आंसू

स्वरकिमयेनें वदनीं फुललें मधुमासाचें हांसू

----------